# मराठी साहित्य व मानवी मूल्ये

संपादक
डॉ. गणेशचंद्र शिंदे
डॉ. संजय जगताप
डॉ. विश्वाधार देशमुख
डॉ. संगीता घुगे

# परिकल्पना

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani

© सम्पादकाधीन

प्रथम संस्करण : 2022

ISBN : 978-93-95104-09-8

मूल्य : ₹ 995

शिवानंद तिवारी द्वारा *परिकल्पना,* के-37, अजीत विहार, दिल्ली-110084
से प्रकाशित और शेष प्रकाश शुक्ल, दिल्ली से टाइप सेट होकर
*काम्पैक्ट प्रिंटर्स, दिल्ली-110032 में मुद्रित*

परिकल्पना
के-37, अजीत विहार, दिल्ली-110084
मो. 9968084132, 7982062594
e-mail : parikalpana.delhi2016@gmail.com

ISBN 978-93-95104-09-8
9 789395 104098

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

# 51. विनोद कुमरे यांचा आदिवासी जीवनमूल्ये उजागर करणारा 'आगाजा' (काव्यसंग्रह)

सखाराम कदम

कुठल्याही कलाकृतीची वाङ्.मयीनदृष्ट्या पाहणी करून तिचे केलेले मूल्यमापन म्हणजे वाङ्.मयीन मूल्य होय. जानकार समीक्षकांनी केलेल्या मूल्यमापनाला अथवा रसग्रहणाला एक मूल्य असते. साहित्य आणि मानवी जीवनाचा संबंध अविभाज्य असतो. मानवी जीवनातील घटनांमधूनच वाङ्मयाची निर्मिती होत असते. साहित्यातील जीवनमूल्ये मानवी जीवनाच्या स्थिरतेसाठी निर्माण झालेली असतात. समाजमनाची त्यास मान्यता असते. देश-काल-परिस्थितीनुसार ही मूल्ये बऱ्याचदा बदलत असतात. सत्य, शिव, सुंदर ही शाश्वत मूल्ये कालप्रवाह कितीही बदलला तरी स्थिर असतात. वाङ्.मय मूल्यांचा जीवनमूल्यांशिवाय विचार करणे अशक्य असते. प्रस्तुत शोधलेखात आपण विनोद कुमरे यांच्या 'आगाजा' या काव्यसंग्रहातून दिसून येणारी आदिवासी जीवनमूल्ये याविषयी काही निरीक्षणे नोंदवणार आहोत.

'आगाजा' म्हणजे आवाहन. आगाजा हा गोंडी भाषेतला शब्द आहे. गोंडी ही एक प्रमुख आदिवासी भाषा आहे. ''मलपृष्ठावर चंद्रकांत पाटील यांची नोंद लक्षात घेऊनच वाचनाला सुरुवात केली. जल, जंगल व जमीन या भोवती निर्धास्त फिरणाऱ्या आदिवासी बांधवांना केलेले हे आवाहन आहे. निसर्ग हाच या कवितेचा आत्मा असून आपण निसर्गावर विजय मिळवणारे निसर्गाशी नेहमी झुंजणारे निसर्ग पुरुष आहोत असा या कवितेतील आवेश आहे. रात्रांदिवस जंगलात, पाड्यावर राहूनही, हिंस्र श्वापदासोबत जगूनही ज्या माणसातील माणुसकी ही शहरी संस्कृतीलाही लाजवेल एवढी उन्नत आहे. त्या माणसांची ग्लोबलायझेशनच्या काळामध्ये होणारी परवड ही कविता मांडते.

संग्रहाच्या सुरुवातीलाच अर्पण पत्रिकेतून कवी भुजंग मेश्राम यांच्या विषयीची कृतज्ञता व्यक्त करताना कवी म्हणतात, ''भुजंग, तुझ्या कवतेच्या शाईचे उडू दे जंगल, जेमिनीवर शिंतोडे तिच्यातून उगवू दे, आदिवासी कवी आणि कवयता उलगुलान पेटवणारी...'' म्हणजेच या कवीची व कवितेचीही बांधिलकी पक्की आहे. तिला जे सांगायचे आणि जसं सांगायचे ते सुद्धा ठरलेले आहे. लोकवाङमय गृहाच्या 'आरंभ कविता' सदरातून व चंद्रकांत पाटील यांच्या सारख्या ज्येष्ठ समीक्षक, संपादक व अनुवादकाच्या पारखी नजरेतून सिद्ध झालेले हे संपादन असल्यामुळे हा सकस, वेचक

आणि वेधक कविता मराठी काव्य रसिकासाठी उपलब्ध झाली आहे. विनोद कुमरे हे मूलतः गोंडी बोली आणि आदिवासी परिसर यातून आलेले कवी आहेत. मात्र बोली गोंडी आणि शिक्षण व व्यवसाय प्रमाण मराठीशी जुळलेले असल्यामुळे या कवीच्या एकूण संग्रहातून येणाऱ्या 28 कवितेत हा मराठी गोंडी बोली संयोग जागोजागी दिसून येतो. एकूण 28 कवितातून अख्ख अरण्य उघड आणि सुघड करण्याची किमया त्यांच्या शब्दांना लाभली आहे.

*संग्रहातील पहिल्याच 'अरण्य' या कवितेत कवी*
*'जल, जमीन, जंगल आणि गगनभरारी पहाडांना बोलता लिहिता,*
*वाचता आलं असतं तर त्यांनी पुकारला असतं विध्वंसरूपी माणसांविरुद्ध बंड*
*लिहिली असती क्रांतीची बात पानापानांवर*
*आणि पेटवलं असतं उलगुलान.' (पृ.1)*

अशी नोंद करून आपल्या कवितेचा आरंभ जागतिकीकरणाच्या विळख्यात सापडलेल्या आदिवासी बिंदूपासून सुरू करतो. आदिवासी समूहाला सुसंस्कृत करण्याच्या नावाखाली शहरी समाजाने त्यांच्यावर घातलेली बंधने, जंगल आणि आदिवासींच्या जमिनीत केलेली घुसखोरी, जंगलात उभारलेले टुमदार बंगले नि पिकनिक हाऊस, डोंगर वाटांचे झालेले सुशोभीकरण यामुळे मूळच्या जंगलाला आलेली वीरूपता, आदिवासींच्या जगण्यातील कुरूप बनून ठसठसत राहते. तेव्हा या नायकाला आठवते आपण पहिल्यांदा आपल्या बायकोला जंगल दाखवत असताना जेव्हा तिच्या कानात कुजबुजलो होतो तेव्हा ती लाजली होती व पानं शहरली होती हिरव्या शृंगाराने.

*'त्या वेलींवरच्या फुलांकडे बघून तो हरकून बोलत होता*
*ती ह्या अरण्यावर विश्वास ठेवून होती बिनधास्त.' ( पृ.3)*

पण पुढे शहरीकरणाचे वारे वाहू लागले आणि जंगलाकडे जीपगाडी धावून आली. अरण्याभोवती कुंपण आखले, शहरा शहरांना जोडणारे डांबरी रस्ते बिनधास्त अरण्यातून आखले गेले आणि यामुळे संतापलेल्या आदिवासी नायकाच्या मनाचा लाव्हा उसळी मारू लागला. त्याला बुद्धाच्या बोधिवृक्षासारखे लाल पळस हवे होते. पण येथे क्रांतीचे बीज पेरावे लागेल याची अपरिहार्य जाणीव त्याला होते. यासाठी तो ह्या शहरीकरणाला 'ग्लोबल श्वापदं घुसली तुझ्या सीमेत अरण्या.' अशी साद घालत जाणीव करून देतो. तो जंगलाच्या मूक असण्यावर चिडतो, संतापतो व त्याच्या गाफीलपणाला दोष देत, महाकाव्यातील दाखले देऊन धिक्कार करू लागतो. ह्या अरण्य बेटाचा परिसर बस्तर, गडचिरोली, झारखंड, छत्तीसगड, बावणगड व गोंडवनाचा पायथा असे विस्तारत जातो. इथल्या अरण्यात पूर्वीपासून चालत आलेली पुराणांची कलाकुसर असतानाही क्रोंच पक्षी आदिम कालापासून विव्हळत राहण्याची आठवण हा नायक करून देतो. तरीही गाफील अरण्य

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

*माणसासारखं हे अरण्यबेट बोलते झाडापानांतून*
*पाखरांशी मांडते जीवाशिवाचा खेळ*
*पाखरं उंडारतात किंवा उडतात कानाकोपऱ्यातून*
*अरण्याच्या कुशीवर विसंबून बिनदिक्कत' (पृ.5)*

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

अशा गाफीलवेळी सावध शिकारी अरण्याच्या पुण्याईला नख लावतो. पाखरांचा लाल चिखल करून हे ग्लोबलायझेशन उभे करतो. ह्या अरण्य बेटाचे महाकाव्य सुद्धा बंदुकीच्या धाकावर लाल चिखलातून, लाल बावटा उभारत उभं राहू बघतांना मानवी प्रवृत्तीचे स्खलन होते व भूकबळी, नक्षलबळी, महारोगाची साथ या गोंडस नावाखाली आलेल्या हेडलाईन एकूण अरण्यालाच सुरूंग लावतात. म्हणून मग मार्क्स जंगलातच भेटतो, तो पुंजीवादी विचारांचा विरोध करताना. जंगलात क्रांती व्हावी तरीही जंगल जनावरांसाठी अभयपणे उभं असावं. जंगलात समता स्थापन करायची असेल तर बंदुकीचा आधार लागेलच याचे निश्चित जाणीव त्याला होते. कारण त्याशिवाय देव आणि धर्म सुद्धा सुरक्षित नसल्याची अपरिहार्यता दिसून येते. येथे जगच एक बाजारपेठ असून घुसखोर अट्टल बनलेत. जे मूळ निवासी आदिवासींना हाकलू पहात आहेत. तेव्हा हे अरण्यबेट बापाच्या काळजीने किंचाळतं. अजूनही :

*बेटाबेटाचा इतिहास एकमेकाला जोडून*
*ते करतात आता ग्लोबलसुवर्णमहोत्सव साजरा*
*जंगल रडतं घनदाट अश्रूतून माण्सा पाखरांसाठी' (पृ. 7)*

असे हे अरण्यरूदन वाचक मनाचा तळठाव घेताना दिसून येते. दोन ते तीन पानाच्या अशा दीर्घकविता असूनही त्या आपली सकस काव्यजाणीव घेऊन अंतर्गत लयीसह आल्यामुळे कविता वाचताना कुठेही खंड पडत नाही. कविता संपते पण मनात विचाराची आवर्तने सारखी उठत राहतात. आदिवासींच्या मनातील विवंचना, चिंता, चिड, उपासमार, याचे हृदयद्रावक चित्रा आपल्यासमोर त्या उभे करतात. आदिवासींच्या हक्काची भाषा उच्चरवाने उच्चारतात.

ग्लोबलायझेशनमुळे चेहरा हरवलेल्या अवस्थेत शहरात येऊन राहणारा आदिवासी तरुण मात्रा जंगल सोडून शहरात येतो तेव्हाही तो 'बेदखल' होतो, पांढरपेशांच्या व्यवस्थेत गावंढळ ठरतो. तेव्हा 'वनव्याने पेटतं माझं जंगल, शोधतो अजूनही भाकरीचं गूढ' या दोन्ही कोड्यांचा अर्थ, जोडत राहतो मी मनात' आणि अशा विदारक वेळी तुम्ही ज्ञानेशाचं पसायदान म्हणत असाल तर कुठली जादूगिरी करणार आहात? या शतकाच्या इतिहासाची रांगोळी रेखाटताना तो भ्रमिष्ट पांथस्थासारखा युगानुयुगे फिरताना दिसतो. त्याला कोरकूच्या आर्त पाव्याची हाक ऐकू येते. त्यामुळे तो अंधार कापीत पुढे जातो. आणि 'शतकांच्या इतिहासाची रांगोळी रेखाटतो'.

शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणातून सर्व समूहाने शिकावे व आपला विकास साधावा या पवित्र उद्देशाने महाराष्ट्रभर सार्वत्रिक शिक्षणाचे लोन पोहोचले होते. महात्मा फुले,

कर्मवीर भाऊराव पाटील आदींनी दारोदार फिरून शाळा उघडल्या व पदरमोड करत चालवल्या हे सर्वज्ञात आहे. तसेच गाव, वाडी, तांड्यावर शाळा उघडल्या. आदिवासी पाड्यावर सुद्धा आश्रमशाळा सुरू झाल्या पण यातूनच शहरीकरणाचा परिचय असलेली एक माऊली आपल्या लेकीला शिकवून हुशार बनवण्याचा, तिला नोकरी लागल्यानंतर बदललेल्या तिच्या आयुष्यक्रमाचा ध्यास घेऊन

*'माय सपनात पाही, मैना जाते हापिसात*
*तिथं फायलीच्या मंदी, हिरव्या जिनगानीची आस'* (पृ.60)

हे शिक्षणाचे तिचे स्वप्न साकार व्हावे यासाठी स्वतः ही माऊली काबाडकष्ट करते. जंगलातील रानमेवा विकून तिला पुस्तक घेते व आपल्या लेकीला 'सायबीन' होण्याचे स्वप्न ती नजरेसमोर ठेवते. यामुळे तिच्या जगण्यातला वनवास संपेल व फाटक्या जिंदगानीतून तिची सुटका होईल असे मायीला वाटते. सुखाचे चार दिवस शहरात जाऊन जगेन म्हणून ती मानलेल्या भावासोबत दहावीच्या लेकीला आश्रम शाळेत सोडण्यासाठी पाठवते. पण तेथेही तिच्या वाट्याला भ्रमनिरास येतो. तो पुरुष विश्वासघात करून तिच्या अब्रूचे लक्तरे उडतो. तेव्हा भ्रमनिरास झालेली ती माऊली शाळेचे दप्तर कवटाळून आश्रमशाळेच्या नावाने शिव्याशाप देत बसते. हाच भाव 'असी जंगलात का गा असते लेकराची शाया?' असा प्रश्न उपस्थित करते व आदिवासींनी शिकण्याचं स्वप्न न पाहता पुन्हा जंगलातच खुशाल मरावे या विचारापर्यंत येते.

*'आदिवासी जंगलात त्याले मरू दे अशानं*
*तुमची शाया शयरात नांदो आणिक सुखानं'* (पृ.61)

तिचा झालेला हा भ्रमनिरास कुठल्याही सुजाण वाचक माणसाला अस्वस्थ करून सोडतो. आदिवासी शिकत नाहीत, त्यांना सुसंस्कृत होण्याची ओढ नाही असं म्हणणारा शहरी समाज मात्र आदिवासींच्या या शोषक व्यवस्थेविषयी चकार शब्द बोलत नसल्याची खंत ही कविता अप्रत्यक्ष सुचवते. एखाद्या कर्तृत्ववान आदिवासी तरुणांना आपला चेहरा बदलण्यासाठी शहर जवळ करावेसे वाटते पण अंगावर गोंदलेले गोंदण काही केल्या पुसले जात नाही. शहरातली मोठी मोठी घर पाहून :

*'तेवा शयरं दाटत व्हती तुया सपनातं*
*आगासाले झोंबलेली घर पावून*
*तुया डोयातली झोपडी थरथरली'* (पृ.44)

यातून आदिवासीच्या मनातील शहरांविषयीचे आकर्षण तर दिसते. पण लवकरच भ्रमनिरास होतो व 'मुखवटा' गळून पडतो. माणसांच्या शहरी गर्दीत राहण्याची सवय नसलेला हा तरुण भांबावतो तरीही मुखोट्याआड आपले आदिवासीपण लपवू पाहतो. पण जेव्हा त्याची सखी 'कसा जगतो रे तू ह्या गर्दीत? 'उलटे काईज माणसाले सोभते का? असा प्रश्न करते तेव्हा त्याचा मुखवटा गळून पडतो. तरीही तो अनेक अनुत्तरीत प्रश्न सोबत घेऊन आजही शहरासंग धावत राहतो.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Tq. Sonpeth Dist. Parbhani

Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516

येथे आदिवासी नायक आपल्या 'होमलँड' च्या शोधात आहे. तेव्हा त्याला एका अटळ सत्याची जाणीव होते.

*'त्यांना करायचंच होतं पादाक्रांत हे अरण्यबेट / लढून, झगडून किंवा विश्वासघात करून म्हणून त्यांनी मांडलं स्वतःचं युद्धसत्य / माणसाच्या कत्तली घडून आणल्या तरीही जल, जमीन जंगल हडपून बायकांवर बलात्कार केले तरीही / त्यांना मांडता येतो अजरामर अमेरिकेसारखा इतिहास लिहिता येतं अक्षर महाकाव्य / आफ्रिका, ऑस्ट्रेलिया कुठल्याही बेटावर' (पृ. 8)*

म्हणजेच जगभरात विस्थापित झालेला आदिवासी कवीच्या नजरेसमोर आज बेघर, असाह्य व आगतिक बनल्याचे चित्रा दिसते. पराजित आदिवासींच्या स्त्रियांचे वासनांध प्रवृत्तीतून केले जाणारे शोषण, क्रूर अमानवीपण सुद्धा गौरवाने हा सुसंस्कृत समाज मिरवतो. जसे जहाजाच्या शिड्यावर पताका किंवा उभारलेले विजयस्तंभ ही या सुसंस्कृत म्हणल्या जाणाऱ्या लेखणीची हातचलाखी. श्रेष्ठपणाच्या वल्गना करणाऱ्या या समाजाचा कावा शिकलेल्या कवीला आज पूर्णपणे समजला आहे. त्यांनी कधी धर्माच्या नावावर तर कधी राजकारणाच्या नावावर या आदिवासींना जवळ केले व त्यांची मानवी नीतीमूल्यं सहजपणे पायदळी तुडवली. या अरण्य बेटावरचे दूर दूर पांगलेले पक्षी सुद्धा या बेटाचं गूढ विसरले याच बाबीचा फायदा घेतला शिकाऱ्यांनी.

*'त्यांना वाटते शिकारीत दडवता येतं काहीही*
*लाल अक्षरांच्या पोथ्या मिरवता येतात ह्युमॅनिझम सांगून*
*कारण ह्यूमॅनिझम आणि अरण्याचा संबंधच जोडता येत नाही.' (पृ.10)*

या आदिवासी स्त्रियांविषयी हा समाज नेहमी आदराने जिथे तिथे बोलताना दिसतो. तिच्याविषयीचे उत्कट प्रेम कधी यांच्या भाषणातून, कधी कवितेतून तर कधी इतिहासातून दिसून येते. पण यांच्यासाठी ही आदिवासी स्त्री म्हणजे :

*' राजपथावरून चालते तेव्हा राजासारखी / म्युझियममध्ये मांडली जाते तेव्हा कैद्यासारखी दिवाणखान्यात मांडली जाते तेव्हा शोभेसारखी /वस्ती, पाड्यात नांदते तेव्हा लक्तरासारखी आजच्या जागतिकीकरणातली कळसुत्री / जी नाचवता येते व्यवस्थेला आपल्या तालावर आपल्याच ढंगान करता आलं पाहिजे तेव्हा वस्त्राहरण / आपल्याच अंगान मांडता येतं आकलन'(पृ.10)*

*अशा या अभ्यासक / समीक्षकाचाही कवी अप्रत्यक्षपणे धिक्कारचं करतो.* आदिवासी स्त्रीच्या ह्या शोषणाला, पराभूतपणाला लोकशाहीचे कुठलेही कलम अजूनही थांबवू शकत नसल्याची खंत ही कविता बोलून जाते. तिच्यासाठी शब्दातून बंड पुकारताना हा कवी तिच्या अस्मितेचा, वंशाचा गौरवपूर्ण उल्लेख करत पृथ्वी, भूगोल, इतिहास यापेक्षाही संस्कृतीचा परिघ जिच्याभोवती फिरतोत्या आदिवासी स्त्रीचा, आदिवासींच्या जगण्यातली उर्मी, गर्मी आणि उधाणलेला उत्साह सुद्धा केवळ तिच्यामुळेच टिकून राहतो हे मान्य करतो.

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

*'तिच्यासाठी उभारले जातात लढे,*
*तंट्या भिल्लापासून नेल्सन मंडेलापर्यंत*
*तिच्या मुक्तीसाठी बिरसानं पुकारलं उलगुलान*
*गणतंत्राचे दिले तंत्रा मंत्रा'* (पृ.11)

तरीही अजूनही आदिवासी स्त्री स्वातंत्र्य समता व बंधुत्वाच्या संकल्पनेतही आपलं हरवलेलं स्वातंत्र्य शोधताना कवीला दिसते. जंगल आणि आपलं मूळ जगणंही निसटत जात आहे, असं दिसल्यानंतर सैरभैर झालेला आदिवासी युवक येथे गुगलवर सर्च करतो, फेसबुकवर प्रश्न मांडतो, चर्चा कमेंट्स मधून पर्याय सुचवण्याची वाट बघतो, तरीही ढासळती नीतिमत्ता मात्र थांग लागू देत नाही. तेंव्हा :

*ज्यांच्या आया बहिणींची अब्रू लुटली जाते कायद्यानं*
*दंडुकेशाहीच्या जोरावर गुप्तांगाची होते चिरफाड*
*पोरा पोरींचं तारुण्य नासवलं जात बंदुकीच्या तालावर*
*त्या व्यवस्थेला फाट्यावर मारू नको तर काय? (पृ.13)*

आदिवासीच्या प्रश्नांचा सुसंस्कृत म्हणवल्या जाणाऱ्या लोकांनी मांडलेला हा बाजार, त्यामध्ये बळीचा बकरा बनलेला आदिवासी, त्यांना भाषणासाठी, ॲसेंबलीत प्रश्न विचारण्यासाठी मिळालेला आयता विषय हेच माणूस स्वस्त आणि कायदा महाग झाल्याचे द्योतक समजू लागतो. आदिवासींच्या प्रश्नावर चर्चासत्र झडतात, पत्राकार, वकील, एन.जी.ओ., पीएच.डी. वाले प्राध्यापक या सर्वांचे आपण भांडवल झाल्याचे लक्षात आल्याने अस्वस्थ झालेला नायक भूतकाळाचे संदर्भ वर्तमानाशी जोडू बघतो. मुख्य प्रवाहासोबत जुळवून घेताना इथला आदिवासी आपले दंडार, अंगभर गोंदन, आणि जगण्यातल्या व्यथा विसरून भांडवलशाहीचाच भाग झाल्याचे वास्तव त्याला दिसून येते. आदिवासींच्या सुधारण्याचे वायदे करणारे हे सगळे समूह आदिवासींनी झाड तोडू नये, वन्य प्राण्यांची हत्या करू नये असे कायदे बनवतात व भ्रमनिरास झालेला आदिवासी पुन्हा पुन्हा आपल्या फाटक्या झोपड्यातच आपल्या वाड्या, बंगल्याचे स्वप्न संपवून टाकतो. इथल्या नायकाचा मुलगा मात्र

*माझा मुलगा त्याचा इत्यास विचारतोय!*
*भूगोलाचाही अभ्यास आहे त्याचा*
*उलगुलान उलगुलान कधीतरी बरळत असतो झोपेत...(पृ.14)*

तरीही शहरात अशी स्वप्न पडलेली आवडत नाहीत लोकांना हे वास्तव न विसरता तो इंटरनेटवर शोधत राहतो काहीतरी. कुळ कायद्याचं वाचतो आणि झोपेतही सावध असतो. हीच एक त्याच्या जमेची बाजू असते सगळं निसटून जातांना.

'पाहांदी पारी कुपार लिंगोची गोस्ट...' या कवितेत कवी विनोद कुमरे जंगलाला साक्षी ठेवून मानवी कल्याण आणि संस्कृतीच्या उत्थानासाठी जल, जमीन आणि जंगलावर हक्क सांगणाऱ्या आदिवासींच्या क्रांतीची आठवण करून देतो.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

*तुझ्या कुशीत कोयापुंगार फुलताना लिंगोच्या डोळयात दाटले अश्रू*
*आणि अपार मानवी महाकारुण्याच्या समुद्रात त्याला गवसले मोती...*
*तो बुद्धाच्या अगोदरचा आदीबुद्धच होता' (पृ.21)*

कारण त्यानेच शांतीची आकांक्षा बाळगली, त्याची कारुण्यपूर्ण न्यायनीती, अहिंसेचे तत्त्वज्ञान, हे अरण्यबेट निःशस्त्र होण्यासाठी चाललेली तळमळ ह्याच जंगलाने बघितली आहे. लिंगोबाने दिलेला मंत्र हा निळया आभाळाची आशा धरणारा, युद्धप्रिय समाज संपवून.. शांतिप्रिय बुद्ध तयार करणाराच असला पाहिजे, ही त्याची धारणा आहे.

ह्या काव्यसंग्रहातील नायक महादेवाला आपला मूळपुरुष म्हणून त्याच्या भोवतीचे सगळे 'मोटिफः एक होता राजा' या कवितेतून उजागर करतो. त्याच्याभोवती रिंगण, फेर, दंडार धरून सूर काढतो. बारी म्हणतो. अमेरिका व आफ्रिका खंडापर्यंत पसरलेल्या, नागालँड, दंडकारण्य व गोंडवनातील बेटाबेटांवरच्या या समस्त आदिवासी अनभिषिक्त राजसम्राटाला काळा, गोरा रंग व सांस्कृतिक भूगोलाबरोबर लोकगाथांमधून आळवतो. दंतकथातून, पुराणकाव्यातून त्याच्याविषयी रेखाटलेल्या प्रतिमा ह्या व्याघ्रचर्म धारण करणाऱ्या, चिता भस्म लावणाऱ्या, गळयात सर्प वेटोळयांनी मंडित असलेल्या, विध्वंसाच्या भेदक तिसऱ्या डोळयातून प्रेतात्म्यांना किंवा भुताखेतांना पळवून लावणाऱ्या व लिंग योनीची प्रतिमा बनून माणसाचा देव झालेल्या मोटिफ मधून कवी शोधू बघतो. तरीही आज झालेला भ्रमनिरास नजरेसमोर ठेवून सांगू लागतो

*'सत्यम शिवम सुंदरम मध्ये मांडलं जातं जगण्याचं सौंदर्यशास्त्र*
*नि तुझी बेटावरची संस्कृती ठरवली जाते जंगली*
*संस्कृती संक्रमणात तू ठरलाय एक मोटिफ*
*नि मी सुद्धा एक मोटिफ...*
*सांस्कृतिक इत्यासाचं भन्नाट इनोव्हेशन*
*मल्टी सोशल नेटवर्किंग कल्चर परिवर्तन' (पृ.32)*

या कवितेतून पौराणिक संदर्भ मांडताना देखील त्याकडे बघण्याची कवीची वेगळी दृष्टी, तो जीवनानुभव चिमटीत पकडताना शब्दांची केलेली नव्याने जुळवणी, जुन्या मिथकांनाही नवा आशय प्रदान करणारी अशी संदर्भसंपृक्त भाषा लक्षणीय ठरते.

भाषेच्या अंगाने 'आगाजा' काव्यसंग्रहाचा विचार करू जाता गोंडी बोली, प्रमाण मराठी व अनेक इंग्रजी शब्दाचे मराठी उच्चारण हे कुठेही आशयाला अडथळा न ठरता आशयाचे सामर्थ्य वाढवणारे घटक म्हणून बेमालूमपणे एकरूप होताना पाहून वाचकही स्तिमित होतो. आशयाची अपरिहार्यताच त्या शब्दांची घडण करते व कविता अधिक संदर्भसंपृक्त बनवते. जसे 'लावण्याबरूबर धावणं', 'हरकत्या पारबतीची साळसुदी कथा' (पृ. 25), 'मावा नाटे मावा राज' (पृ. 23) असले वाक्प्रचार नवखे वाटतात. याशिवाय नेंड, कोंच्या, आठोडी, भैण, इर्लूयाजवळून, लर्कान्या, जंगो, चुट्टा,

उरस्कला, सबेन माडे, पायतेय, तल्लोई, दूचित, बिनागुंडा, इत्यासाच्या, हर्बरा-हर्रा, म्हाद्येवा, खारवा, फल्लार, बुड्याची, आदेवासी, दुकले, लाल पुंगार, कोयापुंगार, बेपारी, लिंगोदेव जंगोदेवी आदी शब्दकळा काहीशी अनोळखी, गोंडी बोलीतील असून तिचे मराठीकरण करताना केलेले अभिनव उच्चारण सुद्धा आशयाची अपरिहार्यता म्हणूनच कवितेत येते व मूळ आशयाला अधिक उठाव मिळवून देते.

याशिवाय वऱ्हाडी बोलीतील सुरपनखे, कायजी, लेयन्याचे, नकु, कोन्ती, म्हुण, लेयते, कस्याच्या, कयत, परवाह, वंस, कंदी, म्या, पिरेम, म्हंजे, आदेम...इ. शब्दांमुळे भाषिक गोडवा कायम ठेवणारे लडिवाळ रूप समोर येते.

ग्लोबल समूहाचा येथील पुंजीवादी विचार, नपुंसक रूढी, आर्त आक्रोश, कत्तलीची अभिव्यक्ती, बाजारबसवे घुसखोर या प्रतिमा देखील एक शोषकव्यवस्था व तिची आदीम परंपरा स्पष्ट करतात.

आदिवासींच्या श्रमाचे शोषण व्यक्त करणारी 'झेल' ही एक अप्रतिम कविता संग्रहात आहे. यामध्ये येथील आदिवासी लोकगीताचा बाज अंगीकारून नादानुकारी, अनुकरणवाचक अशा शब्दांची वेगळया धाटणीची मांडणी केलेली दिसून येते. उदा.

*'एक लिंबू झेलू गं बाई... दोन लिंबू झेलू / तीन लिंबू झेलू ग बाई... चार लिंबू झेलू' (पृ.36)*

तरीही या मूलनिवासी जगण्याची आवर्तने तशीच फिरत राहतात. स्थितीम/ये यत्किंचितही बदल होत नाही. दुसऱ्या उदाहरणात 'म्हादेवा जातो गा... देवा रं माया / म्हादेवा जातो नं... देवा रं माया' (पृ.28) यातील आदिवासी मधील लोकदैवत व त्याविषयीच्या आराधनेचा भाव लोकरीतीला अनुसरून आल्याचे दिसते. सोबतच याच वाक्याची पुनरावृत्ती होताना त्यातील आर्जव नजरेत भरते. याशिवाय

*'खटंग नटंग चवली पाव पाव पावली*
*पाच सुपे मोती पाच सुपे पोवळी*
*हाता हाता धरले मासे हाता हाता फाकले पाणी*
*एक होती बानी एक होती गिनी' (पृ.25)*

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

या कडव्यातून यमक अलंकार 'ली' व 'नी' / 'णी' शब्दांनी साधला आहे. पाव-पाव, हाता-हाता या अभ्यस्त शब्दातील रचनेमुळे त्यातील 'ताल व लय' मनात रुंजी घालत राहते.

*'नऊ खणांची माडी / हरया राजाची पोरगी वेडी / वेडी रे वेडी घातली कोडी / नऊ खणांची माडी' (पृ.27)* या लोकगीतातील अनुप्रासयुक्त शब्दरचनेमुळे कथात्म चित्रामयता अवर्णनीय आनंद देते.

कातकरी, माडिया, गोंड, वारली यासारख्या आदिवासी जनसमूहाविषयी कवीच्या मनात नितांत आदर आहे. आदिवासी नायकाला तो जंगलाचा राजा म्हणूनच ओळख देण्याचा प्रयत्न करताना दिसतो.

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.

*'चामाराच्या जन्मा जाशी तं नाड्या जोती करून मरशी*
*वाण्याच्या जन्मा जाशी तं तोलून तोलून मरशी*
*बामनाच्या जन्मा जाशी तं लिखून लिखून मरशी*
*वारल्याच्या जन्मा जाशी तं जंगलाचा राजा होशी' (पृ.26)*

असं म्हणून हा कवी कवितेतील म्हादेव बुढ्याच्या पार्वताबाईला विळयाला धार लावून ठेवायला सांगतो. कारण या डोंगर द-यांचा इतिहास तिला आता लिहावा लागेल ही अपरिहार्य जाणीव त्याला आहे.

'आगाजा' तिल शुर्पनखा हिडिंबेला (दोन्ही वीरांगणा) व्हाट्सअप रिप्लाय देताना अस्सल गावरान व-हाडी भाषा वापरतात. ह्या दोघी मातृसत्ताक कुटुंब पद्धतीच्या वाहक असल्यामुळे त्यांना एकमेकीची काळजी वाटते. दमनकारी पुरुषसत्ताक व्यवस्थेचा कुटील कावा त्या दोघीपण ओळखून आहेत. हिडिंबा शूर्पनखेला दंडकारण्यात घुसलेल्या राम लक्ष्मणाची(आर्य-अनार्य संघर्ष) वर्दी देते व त्यांच्या गो-या रंगाला, नाक नक्षाला तू भुलू नको, तुझ्या दादाला म्हणजे लंकेश्वर रावणाला आतापासूनच सांगून ठेव! असा सल्ला देते. कारण रामायणात लक्ष्मणाने शुर्पनखेचे कापलेले नाक व स्तन अजूनही हिडिंबेला असह्य यातना देत आहेत. पुरुषसत्ताक व्यवस्था नेहमी स्त्रीला अंकित ठेवण्यासाठी असे जहरी उपाय कालागणिक शोधत असते हे ती पुरेपूर जाणून आहे. बावरलेल्या हिडिम्बे चे सांत्वन करताना येथील शूर्पणखा जो व्हाट्सअप रिप्लाय देते, तो पुढील प्रमाणे-

**रिप्लायः तीन** : *'हाय बाई येरम्मा येरमई( हेरम्बा हिडीम्बा हेडंबा) / राजेकुमारी लर्कान्याचे विरंगणे बाई पिरेम म्हंजे अरण्याचे स्त्रोत / पिरेम म्हंजे सुरजनाच्या आदेम जित्ता परवाह*

*पिरेमाला नसतो रंग-रूप आकार / पिरेम करावं अरण्यासारखं माण्सावर, नावं काढलं का कसं धडधडतं उरोज / म्या करायचं ठरवलं आता परपोज! (पृ.34)*

यातील प्रेमाविषयीची निखळ व नितळ जाणीव सुशिक्षित, सुसंस्कृत म्हटल्या जाणाऱ्या माणसांना सुद्धा लाजवते. ज्या तऱ्हेने शुर्पनखा लक्ष्मणावर त्याच्या सौंदर्यावर मोहित होते, भाळते त्याचा ती सहजसुंदर अविष्कार वरील शब्दातून व्यक्त करते. आपल्या नितळ भावना त्याच्या पर्यंत पोहोचाव्यात म्हणून ती स्पष्ट बोलून मोकळी होते. तरीही त्याचा व्हायचा तोच परिणाम होतो तेव्हा आपली झालेली अवहेलना हिडिंबे जवळ व्यक्त करताना पुढील प्रमाणे मत व्यक्त करते जे अखिल विश्वातील स्त्री जातीच्या भावविश्वालाच हात घालते.

**रिप्लाय : पाच** : *'हाय बाई येरम्मा येरमई( हेरम्बा हिडीम्बा हेडंबा) / राजेकुमारी लर्कान्याचे विरंगणे बाई, याच्यात कोंचा आला पुरुसार्थ / बाईच्या नाक - थानाचा कयत नाई ज्याले अर्थ, ज्या थानावर पोसल्या जाते वंस / ज्या नाकाचा मिरवता येते शेंडा, त्यायचा असा कसा इचार बुचा बांडा! (पृ.34)*

या कवितेच्या ओळी वाचतात पुरुषसत्ताक मानसिकता असलेला पुरुष सुद्धा अंतर्मुख होऊन विचार केल्याशिवाय राहत नाही. आतापर्यंत शुर्पनखेला दोष देणारा समाज ही कविता वाचून मात्र तिला क्लीनचीट दिल्याशिवाय स्वस्थ बसू शकत नाही. एवढे सामर्थ्य या कवितेचे आहे.

या कवितेच्या सातव्या वेळी रिप्लाय देताना शुर्पनखा जे लिहिते ते आजही दमनकारी पुरुषसत्ताक व्यवस्थेचे प्रतीक मानले जावे इतक्या टोकाचे आहे. पुरुषांनी नेहमी सत्तेच्या राजकारणात धूर्त डावपेच टाकून स्त्रीला वेठीस धरले. त्यांच्यामुळेच मातृसत्ताक पद्धती नष्ट होऊन पितृसत्ताक पद्धती पुढे आली. युद्ध असो वा द्युत वेळोवेळी तिच्यावरच बाजी लावली जाते. द्युताचे फासे तिकडे उलटे पडतात व बाई डावावर हरली जाते. हरलेल्या स्त्रीच्या व्यथासुद्धा धर्माच्या नावे येथे खपवल्या जातात. येथे कवितेच्या मूळ ओळी पाहणे संयुक्तिक ठरेल.

*'बायको जुव्यात हरल्याच्या कस्या रंगवल्या जात कथा*
*धर्माच्या नावावर खपवल्या जात बायकांच्या व्यथा*
*बाईच अस्ते बाई धर्मासाठीची आहुती*
*कोणत्या बी वर्तमानातले हाताखालची बावली*
*जिचं कोणत्याबी युगात कर्ता येतं वस्त्राहरण*
*तिच्यासाठी चौकाचौकात सोंगट्याचं राजकारण' (पृ.35)*

कवितासंग्रह वाचून संपला तरीही वाचकाच्या मनात अनेक भाव विचारांची आवर्तने.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani